



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १९ मे २०२५ | अंक १५७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# शिवराज दिवटेला मुंडे गँगकडून मारहाण का करण्यात आली? प्रकरणात मोठं ट्विस्ट

बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटना सुरूच आहेत, बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या करण्यात आली होती, या प्रकरणाचे पडसाद राज्यभरात उमटले, राज्यात संतापाची लाट होती, या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आलं आहे. मात्र पुन्हा एकदा बीडमधून एक हादरवणारी घटना समोर आली आहे. परळीमध्ये शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली, या मारहाणीचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला होता. शिवराज दिवटे असं या तरुणाचं नाव आहे. एका टोळक्याकडून आधी शिवराज याचं अपहरण करण्यात आलं, त्यानंतर त्याला रत्नेश्वर डोंगरावर नेऊन बेदम मारहाण करण्यात आली, बांबू आणि काठीनं मारहाण करण्यात आली. या घटनेत तो गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणात आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात आता नवं ट्विस्ट आलं आहे. बीडच्या परळीतील टोकवाडी परिसरात शिवराज दिवटे याला टोळक्याकडून मारहाण करण्यात आली होती. त्याने दिलेल्या फिर्यादीमध्ये जलालपूरमध्ये झालेल्या मारहाणीचा उल्लेख आहे. जलालपूरमध्ये समाधान




मुंडे आणि ऋषिकेश गिरी यांना मारहाण करण्यात आली होती. त्या मारहाणीचा देखील एक व्हिडीओ आता समोर आला आहे, या व्हिडीओमध्ये ऋषिकेश गिरी आणि समाधान मुंडे यांना लाथा बुक्क्यांनी तसेच काठीने बेदम मारहाण सुरु असल्याचं दिसून येत आहे. दरम्यान या मारहाणीचं कनेक्शन शिवराज दिवटे याला झालेल्या मारहाणीशी असावं असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

## काय आहे नेमकं प्रकरण

अखंड हरिनाम सप्ताहून गावी परत जात असताना संध्याकाळच्या सुमारास शिवराज दिवटे याला टोळक्याकडून अडवण्यात आले, त्यानंतर त्याला बीडच्या परळीतील टोकवाडी परिसरात बेदम मारहाण करण्यात आली. जर वेळीच लोक आले नसते तर मी वाचलो नसतो असं शिवराज दिवटे याने म्हटलं आहे.

# झेडपीत बदल्यानंतरही पुन्हा तिथेच कामकाज; पदभार काढण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेते सरसावले

## राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांचे सीईओसह पालकमंत्री अजित दादांनाही पत्र

बीड: जिल्हा परिषदेत प्रशासकिय बदली होऊनही कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पदभार दिले जात आहेत. तब्बल ७७ कर्मचारी दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करत असल्याने संबधित विभागात अनागोंदी निर्माण झालेली आहे. यामुळे संबधितांचे अतिरिक्त पदभार काढावेत, अशी मागणी सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नेते बळीराम गवते यांनी सीईओ आणि पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. तसे सविस्तर पत्रही दिले आहे. पत्रात म्हटले आहे, जिल्हा परिषद बीड अंतर्गत ७७ कर्मचारी यांची एकाच कार्यालयात १० वर्षापेक्षा जास्तु सेवा झालेली असल्याने शासन नियमाप्रमाणे त्यांची एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यातील कार्यालयात प्रशासकीय बदली झालेली आहे, असे असताना हे कर्मचारी विविध मार्गाने अतिरिक्त कार्यभाराच्या नावाखाली पुन्हा पुन्हा त्याच मुळ कार्यालयात कामकाज करीत आहे. अशा प्रकारचे अतिरिक्त



कार्यभाराचे आदेश हे जिल्हा परिषदेतील काही अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने निर्गमित केले जातात. हे कर्मचारी गेल्या १० वर्षापासून एकाच कार्यालयात कार्यरत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता होण्यासाठी कारणीभूत आहेत. याबाबत अनेक वेळा तक्रारी होऊन सुध्दा अधिकारी वर्ग या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. सदर प्रकरणात लक्ष घालून विविध कारणाने वर्षानुवर्षे एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे हे अतिरिक्त कार्यभाराचे आदेश रद्द करुन त्यांना त्यांच्या मुळ आस्थापनेच्या ठिकाणी कामकाज पाहण्याबाबत आपले स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे, भविष्यात अशा प्रकारच्या प्रशासकीय अनियमितता होवू नयेत, यासाठी ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी असे अतिरिक्त पदभाराचे आदेश काढलेले आहेत, त्या सर्वावर आपले स्तरावरुन उचित कार्यवाही व्हावी, असेही म्हटले आहे.

# प्रवाशांनो सावधान! तीन वर्षांत इतक्या हजार स्मार्टफोनवर डल्ला

ठाण्यातील प्रवाशांच्या जीवावर मोबाईल चोरटे मज्जा मारताय, असं म्हटलं तर तुम्हाला विश्वास बसणार नाही. पण प्रवाशांच्या निष्काळजीपणामुळे मोबाईल चोरट्यांचं नशीब फळफळलं आहे. ठाणे ते दिवा, ऐरोली या प्रवासादरम्यान खिसा कापण्याच्या नाही तर मोबाईल चोरीच्या सर्वाधिक घटना घडल्या आहेत. याविषयीची आकडेवारी धक्कादायक आहे. ही आकडेवारी पाहीली तरी प्रवाशांचा निष्काळजीपणा समोर येईल. या रेल्वे मार्गावर सर्वाधिक मोबाईल चोरी गेल्याचे समोर आले आहे. तेव्हा राहा सावध, होऊन नका सावज, तुमच्या निष्काळजीपणावर चोरटे मज्जा मारताय हे विसरू नका.

4000 मोबाईलची चोरी प्रवाशांचा निष्काळजीपणा चोरट्यांसाठी फायदेशीर ठरला आहे. ठाणे ते दिवा ऐरोली रेल्वे स्थानकात चोऱ्या वाढल्या आहेत. 3 वर्षात 4000 मोबाईलची चोरी गेल्याचे समोर आले आहे. मोबाईल चोरीला गेल्यावर त्याची अनेक जण फिर्याद देतात. तर काही जण काहीच फायदा होणार नाही म्हणून साधी तक्रार सुद्धा दाखल करत नाहीत. पण ही आकडेवारी धक्कादायक आहे. वर्षाला सरासरी हजार मोबाईल चोरीला गेल्याचे समोर येत आहे. या परिसरात चोरांचा सुळसुळाट असल्याचे समोर येत आहे.

# पाटोदयात कुस्तीचा थरार; मान्यवरांच्या उपस्थितीत अरवाडा गाजला

पाटोदा :-.जय हनुमान तालीम यांच्या वतीने पाटोदा येथे पार पडलेल्या भव्य कुस्ती दंगलीत रंगलेल्या दमदार झुंजींनी कुस्तीप्रेमींना अक्षरशः भारावून टाकले. नामवंत पैलवानांनी सहभाग घेतलेल्या या कुस्ती स्पर्धेत अखाड्यात एकापेक्षा एक जोरदार लढती रंगल्या.या भव्य कुस्ती फडाला ह.भ.प. रंधवे बापू महाराज, आमदार सुरेश धस,माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या



उपस्थितीने कार्यक्रमाला अधिकच भारदस्त स्वरूप प्राप्त झाले. कुस्ती संपल्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे व पाहुण्यांचे स्वागत व आभार जय हनुमान तालीमचे प्रमुख वस्ताद पैलवान बाळासाहेब आवारे यांनी केले. त्यांनी कुस्ती ही केवळ ताकदीची नव्हे, तर शिस्त, संयम आणि संस्कारांची शाळा असल्याचे नमूद केले. अखेरपर्यंत रंगतदार झालेल्या या कुस्ती दंगलीत प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत पैलवानांचे कौतुक केले. पारंपरिक खेळांची गोडी आणि गावागावात त्याचा ठसा जपण्याचे कार्य जय हनुमान तालीम करत असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

# अपात्र ठरवलेल्या सरपंच/सदस्य यांना पुन्हा तात्काळ पदभार द्या-प्रा.ईश्वर मुंडे

बीड-प्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी निवडणूक दिनांका पासून एका वर्षाच्या आत आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते.मात्र काही सरपंच व सदस्यांनी विहित कालमर्यादित प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्ह्यातील अनेक सरपंच व सदस्य यांना अपात्र ठरवले होते. राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व सरपंच परिषदेचे दत्ता काकडे यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने महामहीम राज्यपाल यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार सर्व संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाचा वाढीव कालावधी दिलेला आहे. तरी यापूर्वी अपात्र ठरवण्यात आलेले सरपंच,सदस्य व इतर पदाधिकारी यांना पूर्ववत कार्यरत ठेवण्यासाठी नव्याने आदेश काढू न अपात्र ठरवलेल्या सर्व सरपंच, सदस्यांना तात्काळ पूर्ववत पदभार द्यावा अन्यथा दि. १९ मे २०२५ पासून जिल्हाधिकारी,बीड कार्यालयासमोर सर्व सबंधितांना सोबत घेऊन आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिनांक १३ मे २०१९ रोजी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन शैलेश सूर्यवंशी यांना प्रत्यक्ष भेटून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे व सरपंच परिषदेचे अंबादास गुजर, बाळासाहेब गावडे तसेच बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दिला आहे.

# खा. बजरंग सोनवणेंची शिवराज दिवटे यांना रुग्णालयात भेट; परळीतील गुंडगिरीवर कठोर कारवाईची मागणी

बीड: परळी तालुक्यातील अमानुष मारहाणीच्या घटनेत जखमी झालेला लिंबोटा येथील तरूण शिवराज दिवटे हा अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय रूग्णालयात उपचार घेत आहे. दि.१८ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी त्याची रूग्णालयात जावून भेट घेत सर्व घटनाक्रम जाणून घेतला. शिवाय, घाबरू नको, मी सोबत आहे, असाही धीरही दिवटेला दिला. दरम्यान, गेल्या कांही वर्षात तयार झालेला परळी पॅटर्नचा बिमोड करण्यासाठी विशेष आयपीएस अधिकारी नेमून येथील गुंडगीरी मोडीत काढावी, अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली. दोन दिवसांपुर्वी परळीतील अमानूष मारहाणीचा व्हिडीओ समोर आला होता. यात शिवराज टिवटे यास मारहाण करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात शिवराज दिवटे या तरूणावर उपचार सुरू आहेत. त्याठिकाणी जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्याला मिळत असलेल्या उपचाराबाबत संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडुन माहिती घेतली. दिवटे कुटूंबियांना धीर दिला. त्यानंतर केज-अंबाजोगाई रोडवर झालेल्या कंटेनर अपघातात जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली. डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना, याची खातरजमा केली. यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले, परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माण करण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा, परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या कराव्यात, शिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागण्या राज्य सरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे. त्यांना रूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे. त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली. राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात, अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल, असा



इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला. याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंत दुर्दैवी आहे. बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ठ लोकांच्याकडे सापडतात. अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. स्व. संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि मर्डर झाला त्या दिवसापासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे. सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत, मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.

००

परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे.परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे. सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.

०००

बोगस पिकविमा उचलण्यातही हेच लोक बोगस पिकविम्याचे लाखो नव्हे तर करोडो रुपये काही धेंडानी उचलले आहेत. नांदेड, लातूर, परभणी अशा चारपाच जिल्ह्यात बोगस पीकविमा भरला आहे. याची सर्वांकडे ऑफलाईन पद्धतीने तक्रार केलेली आहे, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्याच्या गृहखात्यावर आणि जेल प्रशासनावर बोलले पाहिजेत. बीडचे जेल प्रशासन हे जास्तच बोगस प्रशासन आहे, याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

दैनिक लोकआरंभ — लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १९ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### भारतीय कसोटी संघाचा संक्रमणकाळ

पुढील महिन्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार असून या दौऱ्यात भारतीय क्रिकेट संघ इंग्लंड सोबत ५ कसोटिंची मालिका खेळणार आहे. भारतासाठी हा दौरा खूप महत्वाचा आहे कारण या दौऱ्यापासून भारत विश्व कसोटी चॅम्पियनशिपची सुरुवात करणार आहे. या दौऱ्यानंतर भारत ऑस्ट्रेलियाचाही दौरा करणार आहे. ऑस्ट्रेलियन दौऱ्याची पायाभरणी या दौऱ्यातून होणार आहे. मागील इंग्लंड दौऱ्यात भारताला मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला होता त्याचे उट्टे भारत काढणार का ? या प्रश्नाचे उत्तरही या दौऱ्यात मिळणार आहे. एकूणच भारतीय क्रिकेट संघ या दौऱ्याने क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात करणार आहे मात्र हा दौरा भारतासाठी वाटतो तितका सोपा नाही कारण सध्या भारतीय कसोटी संघ संक्रमनातून जात आहे. भारताचे दिग्गज आणि मॅच विनर खेळाडू असलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी कसोटीतून नुकतीच निवृत्ती घेतली आहे. त्याआधी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना भारताचा सर्वोत्तम फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन यानेही कसोटीतून निवृत्ती स्वीकारली होती. रोहित, विराट आणि अश्विन हे भारताचे खेळाडू जागतिक क्रिकेटमध्ये महान खेळाडू म्हणून गणले जातात. या तींघानी मागील दीड दशकात भारतीय क्रिकेटची धुरा आपल्या खांद्यावर यशस्वीपणे सांभाळली. या तिघांनी भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. आज भारत कसोटीत अव्वल स्थानी आहे त्याचे श्रेय या तिघांनाच जाते. हे तिघेही भारतीय कसोटी संघाचे केवळ अविभाज्य घटकच नव्हते तर संघाचे आधारस्तंभ होते. त्यांच्या निवृत्तीने भारतीय संघात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ते नसल्याने बलाढ्य भारतीय संघ कुमकुवत वाटू लागला आहे. इंग्लंड सारख्या महत्वाच्या दौऱ्यावर त्यांची अनुपस्थिती भारताला नक्कीच जाणवेल मात्र यातूनही भारतीय क्रिकेटला मार्ग काढावा लागेल. अर्थात भारतीय क्रिकेट संघावर अशी वेळ पहिल्यांदाच आली आहे असे नाही. २००० साली जेंव्हा मॅच फिक्सिंग प्रकरण उघडकीस आले तेंव्हा संघातील ज्येष्ठ खेळाडू ंना घरचा रस्ता दाखवण्यात आला. संघात अनेक नवोदित खेळाडू ंचा समावेश करण्यात आला. सौरभ गांगुलीकडे संघाची धुरा सोपवण्यात आली. त्याने सचिन, द्रविड, लक्ष्मणला सोबत घेऊन संघाची बांधणी केली. गांगुलीने वीरेंद्र सेहवाग, हरभजनसिंग, युवराज सिंग, जहीर खान, धोनी या युवा खेळाडू ंना घेऊन संघाला उभारी दिली आणि पुढील दशकभर भारताने क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवले. त्यानंतर २०१० ते २०१३ या कालावधीत सौरव गांगुली, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, लक्ष्मण, वीरेंद्र सेहवाग, अनिल कुं बळे, युवराज सिंग, हरभजन सिंग जहीर खान हे दिग्गज खेळाडू निवृत्त झाले मात्र महेंद्रसिंग धोनीने रोहित शर्मा, विराट कोहली, रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शिखर धवन, जसप्रीत बुमरा या युवा खेळाडू ंना हाताशी धरून संघाची बांधणी केली पुढे या संघानेही दशकभर क्रिकेटविश्वावर अधिराज्य गाजवले. आताही भारतीय संघावर तीच वेळ आली आहे. रोहित, विराट आणि अश्विनच्या निवृत्तीनंतर भारतीय संघाची नव्याने बांधणी करण्याची वेळ आली आहे. बीसीसीआय आणि निवड समिती त्यासाठी काळजीपूर्वक पावले टाकत आहे. भारतासाठी सर्वात महत्वाचा आणि मोठा प्रश्न आहे की या नव्या संघाचा कर्णधार कोण असेल ? भारतीय संघाच्या नव्या कर्णधाराच्या शर्यतीत शुभमन गिल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा हे तिघे आहेत. यात बुमरा ज्येष्ठ असून त्याच्या पाठीशी मोठा अनुभव आहे मात्र बुमराची दुखापत हा चिंतेचा विषय आहे. दुखापतीमुळे तो पूर्ण मालिका खेळेल हे देखील कोणी सांगू शकत नाही त्यामुळेच त्याचा विचार कर्णधार म्हणून होईल असे वाटत नाही. ऋषभ पंत हा आताताई क्रिकेटर आहे. कसोटीत लागणारा संयम त्याच्याकडे नाही त्यामुळे युवा शुभमन गिल हाच भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल असे वाटते. शुभमन गिल २५ वर्षाचा आहे शिवाय त्याच्याकडे नेतृत्वगुण आहेत. आयपीएलमध्ये त्याने गुजरात टायटन्स या संघाचे नेतृत्व ज्याप्रकारे केले आहे ते पाहून सर्वजण प्रभावित झाले आहेत. सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कला त्याच्याकडे आहे शिवाय प्रशिक्षक गौतम गंभीरचाही त्याच्या नावाला पाठिंबा आहे त्यामुळे तोच भारताचा नवा कर्णधार असेल अशी दाट शक्यता आहे. आता निवड समिती त्याला कसा संघ देतील हे पाहावे लागेल. के एल राहुल, ऋषभ पंत आणि जसप्रीत बुमरा या अनुभवी खेळाडू ंना सोबत घेऊन निवड समिती देईल त्या नवोदित खेळाडू ंना घेऊन गिलला संघ बांधणी करावी लागेल. जे काम सौरभ गांगुली आणि धोनीने केले तेच काम शुभमन गीलला करावे लागेल. त्यात जर तो यशस्वी झाला तर तो देखील भारताचा यशस्वी कर्णधार ठरेल भारतीय कसोटी क्रिकेट संघ पूर्वीसारखा क्रिकेट विश्वावर अधिराज्य गाजवेल यात शंका नाही.

## दहावी बारावीच्या टक्केवारीवरुन विध्यार्थ्यांची श्रेष्ठता व कनिष्ठता ठरवणे चुकीचे आहे.

साभार :- प्रा.परमेश्वर बनकर, बीड 9503288282

मुलांनी चांगला अभ्यास करावा, चांगले मार्क मिळवावेत ही प्रत्येक पालकांची इच्छा असते, आणि अशी इच्छा बाळगणे काही चुकीचे पण नाहीये. परंतु चांगले मार्क मिळाले म्हणजेच मुलाचं भविष्य आहे, चांगले मार्क मिळाले म्हणजेच मुलगा खूप हुशार आहे, चांगले मार्क मिळाले म्हणजे मुलगा खूप गुणी आहे. दहावी बारावीला किंवा त्यापुढील वर्गाच्या परीक्षेत चांगले मार्क घेणारे मुलच आयुष्यात यशस्वी होतात हा जो गैरसमज समाजाच्या मनावरती बिंबला गेला आहे तो अतिशय चुकीचा आहे.या अश्या गैरसमजा मुळे मुलांना असं वाटत आहे की चांगले मार्क घेणे म्हणजेच श्रेष्ठत्व आहे, चांगले मार्क घेणे म्हणजेच उच्च व्यक्तीत्व होय, चांगले मार्क घेणे म्हणजेच सर्वगुण संपन्न असणे होय. जर चांगले मार्क मिळाले नाही तर आपलं काही भविष्य नाही, चांगले मार्क मिळाले नाही तर समाज आपल्याला ढ समजेल, चांगले मार्क मिळाले नाही तर आपल्याला समाजात खाली मान घालावी लागेल आपल्याला कोणी मानपान देणार नाही या ओझ्याखाली मुलं मुली दबली जात आहेत. याचं कारण म्हणजे समाजाने कागद पत्रावरील गुणवत्तेलाच सर्वस्व मानलं आहे.कागद पत्रावरील गुणवत्ते वरूनच विध्यार्थ्यांचे भविष्य वर्तवले जात आहे. म्हणून प्रत्येक विध्यार्थी हा कागदपत्रावरील गुणवत्ता वाढण्यासाठी झटत आहे.आपल्या मुलांची कमी वयातच शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे, त्याला कमी वयातच इंग्रजी व तत्सम विषय वाचता लिहिता आले पाहिजेत, तो वर्गात नेहमी पहिला यावा या साठी सुद्धा पालकांची स्पर्धा लागलेली आहे. म्हणून पालक मुलांना शाळा झाली की टीव्ही शन आणि टीव्हीशन झालं की होमवर्क या मधेच व्यस्त ठेवत आहेत.

आपला मुलगा कोणत्या विषयात हुशार आहे, आपल्या मुलाला कोणत्या विषयाची आवड आहे, किंवा त्याला कोणत्या क्षेत्रात करियर करायचे आहे. किंवा त्याच्या मध्ये कोणता गुण आहे, कला आहे, किंवा त्याला कोणत्या खेळात आवड आहे याचा विचार कोणीही करायला तयार नाही.मुलांची इच्छा नसताना त्याला न आवडणारे विषय घ्यायला लावणे, आवड नसलेला कोर्स करायला लावणे,त्याच्यावर मानसिक प्रेशर लादने आणि त्याला केवळ स्पर्धात्मक शिक्षणा मध्ये ढकलणे हे काम पालकांकडून सातत्याने होत आहे. यामुळेच कमी मार्क पडल्याने मुलं डिप्रेशन मध्ये जात आहेत.या अट्टहासा मुळे मुलांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होत आहेत.

खरंतर पालकांनी मुलांच्या शालेय शिक्षणा बरोबरच त्यांना चांगले संस्कार, नैतिक मूल्ये, सामाजिक भान, थोरा मोठांचा आदर, चारित्र्य संपन्नता इत्यादी गोष्टीसाठी सुद्धा प्रेरित केले पाहिजे.मुलांनी एवढेच मार्क घेतले पाहिजेत तेवढेच मार्क घेतले पाहिजेत अश्या प्रकारचे दडपण मुलांवरती न टाकता, आपल्या मुलाला ज्या क्षेत्रात आवड आहे त्याला त्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी मदत करावी.

केवळ कागद पत्रावरील गुणवत्ते वरून विध्यार्थ्यांमधील श्रेष्ठता आणि कनिष्ठता ठरवण्याच काम समाजाने तसेच पालकांनी करू नये. विध्यार्थ्यांमधील सर्वच कला गुणांना वाव मिळेल आणि विध्यार्थी या चुकीच्या मानसिकतेचे शिकार ठरू नयेत म्हणून सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ज्या विध्यार्थ्यांना दहावी बारावीला कमी मार्क मिळाले आहेत त्यांनी खचून न जाता स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा. धन्यवाद..

## डॉ.सुधाकर चव्हाण यांच्या दूरदृष्टी गुणांमुळे संशोधक वृत्तीला चालना!

बुद्धी कौशल्याचा कस लावत प्रचंड ध्येय निष्ठा कष्ट चिकाटी मेहनत परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर ग्रामीण भागातील संशोधक वृत्तीच्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा आणि मार्गदर्शन किंबहुना त्यांचे मनोबल वाढवून संशोधक वृत्तीला चालना देण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण कर्तव्य पालन करणारे कर्मचारी अधिकारी सिनेट मेंबर म्हणून डॉ.सुधाकर चव्हाण यांच्या कडे पाहिले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथील संशोधन विभागामध्ये कार्यरत असलेले डॉ सुधाकर चव्हाण यांच्या कडे कर्तव्यदक्ष कर्मचारी म्हणून पाहिले जाते. सातत्याने आपल्या कर्तव्य पालनात निपुणता, चिकित्सक वृत्ती, दाखवत प्रत्येक काम अत्यंत प्रमाणिकपणे आणि अगदी वेळेत करून एक वेगळा आदर्श निर्माण करण्यात त्यांचे वेगळेपण त्यांनी जपले आहे. गेल्या दोन दशकावून अधिक काळ विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये एक प्रशासनाचा महत्त्वपूर्ण भाग व घटक म्हणून ते अत्यंत चोख आणि शिस्तप्रियतेने कर्तव्य पालनातून कार्य करणारे व्यक्तिमत्व ठरले आहे. कुठलीही फाईल पेंडिंग न ठेवता अत्यंत पूर्ण वेळ सक्रिय राहून किंबहुना इतक्यात तत्परतेने पुढील व्यक्तीला न्याय देण्याचा प्रमाणिकपणे प्रयत्न करणारे एक सहृदयी कर्तव्यनिष्ठ आणि आणि तितकेच कडक स्वभावाचे म्हणूनही ते परिचित आहेत. मराठवाड्याची राजधानी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये विशेषता ग्रामीण भागातील अनेक संशोधक वृत्तीचे तरुण अत्यंत महत्त्वपूर्ण विषयाला घेऊन संशोधनातून नवनिर्मिती करण्याचा प्रयत्न करीत असतात. या अशा होतकरू, चिंतनशील आणि प्रचंड कष्ट घेणाऱ्या संशोधकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना ऊर्जा बळ शक्ती आणि प्रेरणा देणारे डॉ.सुधाकर चव्हाण सर यांच्या दोन दशक कर्तव्य पुर्ती निमित्ताने त्यांच्या भविष्यातील यशदायी निरोगी आणि जनसामान्यांच्या भावनेला योग्य न्याय देत कार्य करणाऱ्या प्रमाणिक सेवाभावी वृत्तीला डॉ. बाबासाहेब आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशनचे युवा राष्ट्रीय अध्यक्ष विझार्थि विकास गवई यांनी शुभेच्छा दिल्या. संशोधन कार्यातून नवनिर्मितीची संशोधन कार्यातून नवनिर्मितीची संशोधन कार्यातून नवनिर्मितीची संशोधन कार्यातून नवनिर्मितीची संशोधन कार्यातून नवनिर्मितीची अपेक्षा! अपेक्षा! अपेक्षा! अपेक्षा! अपेक्षा! दरम्यान, ग्रामीण भागातील अनेक बुद्धिमान चिकित्सक तरुणाईने विविध ग्र ंथ आणि लेखकांच्या लेख साधनेतील ग्र ंथांचा आधार घेत एखादा विशेष विषय घेऊन त्यावर संशोधन करत राष्ट्रासाठी नवनिर्मिती करून एक नवा आयाम करावा. विद्यापीठातील कुलगुरू, कुलसचिव आणि वरिष्ठ पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनातून संशोधकांनी मानवी समाज व्यवस्था, राज्य आणि देशहितासाठी आपली संशोधन वृत्ती पणाला लावावी, अशी अपेक्षा डॉ.सुधाकर चव्हाण यांनी व्यक्त केली.

## ज्वारी खरेदी प्रक्रियेस विलंब शेतकऱ्यांतून नाराजीचा सूर : आंदोलनाचा इशारा
### ज्वारी पिकाची खरेदी तातडीने करण्याची सभापती गजानन मुंडे यांची मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : एफ. पी. एम. एस. योजनेंतर्गत किनवट तालुक्यातील जवळपास १३०० शेतकऱ्यांनी ज्वारीसाठी नोंदणी करून पात्रता प्राप्त केली आहे. मात्र, प्रत्यक्ष शेतमाल खरेदी प्रक्रिया अद्याप सुरु न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. याअनुषंगाने किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देवून ज्वारी पिकाची प्रत्यक्ष खरेदी तातडीने करण्याची मागणी केली आहे. अन्यथा प्रशासना विरुध्द सभापती व संचालक मंडळ आंदोलन छेडणार असे नमुद केले आहे. यावेळी बाजार समितीचे संचालक कैलास बिज्जमवार यांची उपस्थिती होती. या पार्श्वभूमीवर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील यांनी जिल्हाधिकारी नांदेड, तहसिलदार किनवट, सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट व खरेदी अभिकर्ता आदिवासी विकास महामंडळ किनवट यांना पत्राद्वारे निवेदन दिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी तात्काळ खरेदी प्रक्रिया सुरु करण्याची मागणी केली आहे. सभापती तसेच संचालकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, 'जर खरेदी प्रक्रिया त्वरित सुरु झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडले जाईल' शेतकऱ्यांचा संयम संपत चालल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाकडून तत्काळ निर्णयाची अपेक्षाः शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

## धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

### दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी - धनंजय मुंडे

### आम्ही शिवराज दिवटे व कुटुंबियांच्या पाठीशी; मुंडेंनी शिवराज सह दिवटे कुटुंबीयांशी संवाद साधत दिला धीर

### या घटनेत जाती धर्माचा संबंध नाही - धनंजय मुंडे यांनी पोलीस अधीक्षक यांच्या भूमिकेचे केले समर्थन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) - दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

## पाटोदा हायस्कूल पाटोदा बेलखंडी तालुका जिल्हा बीड या शाळेची यशाची परंपरा कायम

बीड दि.१५(प्रतिनिधी):- तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित पाटोदा हायस्कूल पाटोदा बे. ता. जि. बीड या शाळेने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातही यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या वर्षात शाळेचा एस एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल 98.82 टक्के लागला आहे. शाळेतील यशस्वी विद्यार्थी येळवे ऋतुजा सुभाष 93. 80 टक्के गुण घेऊन प्रथम, कु. माने रूपाली लक्ष्मण 93% गुण घेऊन द्वितीय व कु. माने ऋतुजा भागवत 92 . 60% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेब यांनी केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री राजूजी मचाले साहेब व सहाय्यक प्रशासक अधिकारी श्री योगेशजी पवार साहेब श्री एम ए राऊत सर कार्यालयीन अधिकारी व श्री प्रकाशजी राठोड कार्यालयीन अधीक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री धनवंतजी मस्के साहेब व शाळेचे शिक्षक वृंद व शिक्षकेतर यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या तसेच पाटोदा व बेलखंडी तसेच सर्व परिसरातील ग्रामस्थ व परिसरातील पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन केले आहे.

## सामुहिक बौद्ध विवाह मेळाव्यात २२ जोडपी विवाहबद्ध

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : अजिंक्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने १८-मे रोजी कलावती गार्डन येथे संपन्न झालेल्या १९ व्या सामुहिक बौद्ध विवाह मेळाव्यात २२ जोडपी विवाहबद्ध झाले. याप्रसंगी वधु-वरांना आशिर्वाद देण्यासाठी शिवसेना जिह्लाप्रमुख जोतिबा खराटे,नारायणराव सिडाम, बेबीताई नाईक,ॲड. राहुल नाईक,ॲड.सुभाष ताजने,माजी नगराध्यक्ष के.मुर्ती,व्यंकटराव नेम्मानिवार,अभय महाजन, पत्रकार प्रमोद पोहरकर, फुलाजी गरड, किरण ठाकरे,संजय सिडाम यांच्यासह विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी माजी नगराध्यक्ष अरुण आळणे,माजी नगरसेविका करुणा आळणे, अजिंक्य आळणे, ॲड.आकांक्षा आळणे, अतुल बनसोड, प्रविण गायकवाड,दिनेश कांबळे,विजय पोलासवार यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १९ मे २०२५
https://lokaarambh.com



## 40000 कोटी रुपयांची साम्राज्य सोडून बनला बौद्ध भिक्षू

कोलंबो: ४०००० कोटीच्या संपत्तीचा त्याग करून अब्जाधीशाचा मुलगा बौद्ध भिक्षु बनला आहे अजहन सिरीपाण्वो असे यांचे नाव आहे श्रीलंकेतील तामिळ दूरसंचार टायपिंग आनंद कृष्णा हे सिरीपाण्वो यांचे वडील आहेत टेलिकॉम मीडिया तेल आणि वाय रियल इस्टेट आणि उपग्रह असा आनंदा कृष्णा यांच्या उद्योगाचे साम्राज्य आहे एवढ्या मोठ्या साम्राज्याची सिरीपाण्वो हे एकुलती एक वारसदार आहेत कृष्णन यांची किमान एक कंपन्यांमध्ये भागीदारी आहे ते मलेशियातील तिसऱ्या क्रमांकाची श्रीमंत व्यक्ती आहेत सिरीपाण्वो त्यांचे वडील आनंदा कृष्णन यांची एकूण संपत्ती सुमारे पाच अब्ज डॉलर म्हणजेच ४०००० कोटी इतकी किती आहे म्हणून ओळखले जाणारे कधीकाळी दूध संचार क्षेत्रातील आघाडीचे भारतीय फोन एयर सेलचे मालक होते इतकच नाही तर दिग्गज एम एस धोनीच्या नेतृत्वाची आयपीएल संघ चेन्नई सुपर किंग ला देखील प्रायोजित केले होते ब्रिटनमध्ये दोन बहिणीसह लहानाचे मोठे झालेले ८ भाषा बोलू शकतात सिरीपाण्वो यांचे वडील आनंदा कृष्णन हे स्वतः बौद्ध धर्मीय आहेत दानशूर म्हणून सुद्धा ते ओळखले जातात शिक्षणापासून मानवतावादी प्रयत्न पर्यंत अनेक कारणासाठी देणगी देतात आनंद कृष्णा यांचा मुलगा सिरीपाण्वो यांनी सर्व संपत्ती सुख आणि ऐश्वर्याचा त्याग करत संन्यास घेतला आहे वयाच्या १८ व्या वर्षी सिरीपाण्वो बौद्ध भिक्ष बनले

## सैनिकांच्या सन्मानार्थ मंगरूळपीर येथे तिरंगा रॅली

प्रतिनिधी मंगेश खाडे मंगरूळपीर: भारतीय सैनिकांच्या सन्मानात १७ मे रोजी मंगरूळपीर शहरात तिरंगा रॅली करण्यात आली आमदार श्याम खोडे यांचे नेतृत्वात छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रॅलीला सुरुवात झाली रॅलीच्या प्रारंभ १९७१ च्या भारत पाकिस्तान सहभाग घेतलेल्या मंगरूळपीर तालुक्यातील माजी सैनिकांचा आमदार खोडे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी खड्ड्यांचा नाश करण्यात आल्याचा पार्श्वभूमीवर व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व गुणांचा गौरव करण्यासाठी ही तिरंगा रॅली काढण्यात आली तिरंगा रॅली




जुनी शशीमोहन टॉकीज रस्ता महाराष्ट्र चौक संत श्री बिरबलनाथ महाराज मंदिर महाराणा प्रताप चौक वीर भगतसिंग चौक मार्गे जात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे समारोप करण्यात आला या रॅलीत भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष सुनील मालपाणी, प्रा वीरेंद्र सिंग ठाकूर, सतीश हिवरकर, रवींद्र ठाकरे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शारीक सौदागर, भाजप शहराध्यक्ष अभिषेक दंडे, अनिल गावंडे, डॉ. दिलीप रत्नपारखी, प्रमोद घोडचर, किशोर घोडचर, प्रवीण देशमुख, महादेव निंबेकर, सतीश राठी, सचिन पवार आदी सह अनेक मान्यवर उपस्थित होते

## बॉलीवूडची अनेक गाणी जेथे चित्रीत झाली त्या धरणाची शताब्दी येतेय..

साल १९८५ मध्ये प्रदर्शित झालेला 'राम तेरी गंगा मैली हो गयी' या चित्रपटासह अनेक हिंदी मराठी चित्रपटाचे शूट झाले तो भंडारदरा यंदा १०० वर्षांचा होत आहे. होय यंदाचे वर्षे हे भंडारदरा धरणाच्या शताब्दीचे वर्षे आहे.या ब्रिटीशकाळात अभियंत्यांनी साल १९०५ मध्ये या जागेचे सर्वेतक्षण केले आणि साल १९१० मध्ये प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली आणि १९२६ मध्ये या धरणाचे काम अखेर पूर्णत्वास आले.

भंडारदरा धरणाला उभारण्यासाठी ८४ लाख रुपये त्याकाळात खर्च झाले होते.येथे १८७५ मध्ये श्रीरामपूर-राहाता भागात पाण्यासाठी कालवे खोदण्यात आले होते. संगमनेर तालुक्यात ओझर येथे १८८५ मध्ये पिकअप वॉल बांधली गेली. आधी शेतीच्या सिंचनाकरीता येथे कालवे बांधले नंतर मग गुळ आणि चुनखडी वापरुन कातळ खोदून बेसाल्ट खडकाची भिंत उभारण्यात आली होती. अखेर हा विल्सन डॅम साल १९२६ रोजी पूर्ण झाला. त्याकाळात ब्रिटीश स्थापत्यशैली आणि भारतीय मजूरांनी हे धरण १६ वर्षात बांधून काढले. या धरणाच्या पाणी अडविणाऱ्या भिंतीची उंची २७८ फूट इतकी आहे. त्याद्वारे ४७ चौरस किलोमीटर पाणलोट क्षेत्र आहे.

या धरणाच्या कामासाठी त्याकाळात ८४ लाख १४ हजार १८८ रुपये खर्च झाल्याची आकडेवारी सांगते. हे धरण शंभर वर्ष पूर्ण होत आले तरीही मजबूत असून केवळ १९७३ मध्ये भंडारदरा धरणाच्या भिंतीचे बळकटीकर झाले होते. ८५ मीटर उंची इतका ११०३९ दशलक्ष घनफूट इतका पाणी साठविण्याची या धरणाच्या भिंतीची क्षमता आहे.

सजनी ग भुललो मी, काय जादू झाली..भंडारदरा, रंधा धबधब्या परिसरात १९४० पासून शंभर हून अधिक चित्रपट आणि ३९ गाण्यांचे चित्रीकरण येथे झाले आहे.१९८५ सालच्या आर.के.बॅनरच्या 'राम तेरी गंगा मैली चित्रपटातील 'तुझे बुलाये ये मेरी बाहे.. ' आणि कित्येक गाण्यांचे चित्रीकरण भंडारदरा धरणाच्या बागेतील प्रसिद्ध अम्ब्रेला फॉलजवळ झाले आहे. याच धबधब्यात अभिनेत्री मंदाकिनी यांच्यावर ते बहुचर्चित सीन चित्रीत करण्यात आला होता.'सजनी ग भुललो मी, काय जादू झाली' हे भिंगरी या मराठी चित्रपटातील सुषमा शिरोमणी आणि विक्रम गोखले यांच्यावर चित्रीत झालेले गीत येथे शूट झाले होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यानास अवकळा..

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे खाजगी जहागिरीचे गाव असलेल्या अंबड शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उद्यानास अवकळा आली असुन प्रशासकीय उदासीनतेमुळे पुष्कर्णी बारव आणि उद्यानाची दुर्दशा झाली आहे. अंबड परगण्यातील 267 गावे अहिल्यादेवींच्या खाजगी जहागिरीचे होते या गावातून मिळणाऱ्या करातून अहिल्यादेवींनी देशभर मंदिर, बारव,घाट,धर्मशाळा,अन्नछत्र,नंदी मंडप, शिखर,कुंड,विहीरी निर्माण केल्या आहेत. ज्याचा उपयोग आजही लोक घेतांना दिसून येतात.2025 हे पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जयंतीच्या त्रिशताब्दी जयंतीचे वर्षे असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संपूर्ण वर्षभर कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवींच्या चौंडी या जन्मगावी कॅबीनेट बैठक घेवून मंत्रीमंडळात वेगवेगळे निर्णय घेतले आहेत. चौंडी, महेश्वर, इंदौर प्रमाणे अंबड शहर महत्त्वाचे असुन अहिल्यादेवींनी मत्स्योदरी देवी मंदिर, श्री. खंडोबा



मंदिर, महादेव मंदिर, पुष्कर्णी, कांवदी,महाद्वारी, मोती, राणी, सासुसुनेची बारव ,महाराष्ट्र द्वार, जालना वेस,शहागड वेस,नागोबा वेस,जंगी तलाव आदी त्यांच्या खाजगी करातून निर्माण केलेले आहेत या वारसा स्थळांचे जतन करण्यासाठी पालिका तसेच महसूल प्रशासन लक्ष देत नाही उलट गुत्तेदार पोसण्यासाठी छोटी मोठी सुमार दर्जाची कामे केली जातात पुष्कर्णी बारवेची उत्तर दिशेची भिंत कोसळण्याच्या मार्गावर असतांना देखील त्याकडे लक्ष दिले जात नाही याकरिता सामाजिक संघटना कडुन अनेकदा निवेदने देण्यात आली आहेत मात्र त्यावर कोणतेही निर्णय झाले नाहीत.तत्कालीन मुख्याधिकारी श्री देशमुख यांनी वैयक्तिक लक्ष देवी अहिल्यादेवी उद्यानात झाडे लावली होती मात्र नंतरच्या काळात या उद्यानात कोणतेही खेळणी, बैठक,लाईट, शौचालय, पिण्याचे पाणी उपलब्ध न केल्याने उद्यानाचा वापर कचरा टाकण्यासाठी व लघुशंकेसाठी केला जातोय. उद्यान विकसित करतांना तेथील ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन कामे करावीत अशी मागणी जोर धरीत आहे.

.अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केलेल्या मंदिर आणि बारवा मुळे अंबड तालुक्याची जगात ओळख आहे अहिल्यादेवीनी निर्माण केलेली मंदिर, बारवा घाट पाहण्यासाठी देश विदेशातून पर्यटक, अभ्यासक येतात मात्र तेथील दुरावस्था पाहुन ते नाराज होतात. अहिल्यादेवींनी निर्माण केलेला वारसा जतन करण्यासाठी प्रशासकीय मानसिकता बदलण्याची गरज असुन नागरिकांनी वारसा जतन करण्यासाठी लोकसहभाग वाढवला पाहिजे.

\- रामभाऊ लांडे
\- अभ्यासक होळकर राजघराणे इंदौर

# अकरावीचा प्रवेश आज पासून राज्यात १९८१ महाविद्यालयाची नोंदणी

दै. प्रजाशासन न्यूज / प्रतिनिधी ठकसेन गायकवाड गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत यंदा विक्रमी वेळेत जाहीर झालेल्या दहावीच्या निकालानंतर आता राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय राज्यभरातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी सज्ज झाले आहे सोमवार दिनांक १९ मे पासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशासाठी http://mahafyjcaddmission.in या संकेतस्थळावर नोंदणी करून महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम भरणे आधी प्रक्रिया पूर्ण करायची आहे यंदा राज्यभरात ९२८१ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेता येतील यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होत असून त्याचे शिवधनुष्य कसे मिळवणारा याची चिंता शिक्षक तज्ञापासून अनेकांना होती पण संचालनालयाने महाविद्यालय व संस्थाच्या नोंदणीचा पहिला टप्पा नियोजित वेळेत पार पाडला वर्ष २०२५- २६ च्या अकरावी ऑनलाइन प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांना




http://mahafyjcaddmission.in या संकेतस्थळावरुन करायची आहे संचालनालयाने हे संकेतस्थळ आधीच कनिष्ठ महाविद्यालय व शाळा यांना त्यांच्याकडील जागांच्या नोंदणीसाठी खुले केले होते त्यानुसार शनिवार १७ मे पर्यंत ही नोंदणी पूर्ण झाली आता नियोजित वेळापत्रकानुसार सोमवार १९ मे पासून विद्यार्थ्यांसाठी हे संकेतस्थळ खुले होणार आहे अशी माहिती माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक संचालक डॉक्टर महेश पालकर यांनी दिली विभागातील नोंदणी झालेली महाविद्यालये अमरावती १४२२ छत्रपती संभाजीनगर १३२३ कोल्हापूर १३७ लातूर ६२५ मुंबई १२६५ नागपूर १२७५ नाशिक ९१३ पुणे १५२१ एकून ९२८१

# 'संजय राऊत काय स्वातंत्र्य लढा लढून जेलमध्ये गेले नव्हते', रावसाहेब दानवेंनी पुस्तकावरून डिवचलं

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आपल्या पुस्तकामध्ये अनेक गौप्यस्फोट केले आहेत. संजय राऊत यांच्या या पुस्तकावर राजकीय वर्तुळातुन विविध प्रतिक्रिया येत आहे. भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी राऊत यांच्या या पुस्तकावर प्रतिक्रिया देताना हल्लाबोल केला आहे.

नेमकं काय म्हणाले दानवे?

एखादं पुस्तक लिहिणं आणि त्या पुस्तकांमध्ये आपला जीवन परिचय, राजकीय जीवनात आणि आयुष्यात कोणत्या संकटांना तोंड दिलं, एवढ्या



संकटाला तोंड देऊन मी इथपर्यंत कसा पोहोचलो. जे काही महान नेत्यांनी पुस्तक लिहिलेले आहेत त्यामध्ये हे नमूद असतं. परंतु एखादं पुस्तक केवळ आणि केवळ लोकांवर आरोप करण्यासाठी लिहायचं असेल, तर त्या पुस्तकाला पुस्तक म्हणता येणार नाही. असा टोला भाजपचे नेते रावसाहेब दानवे यांनी संजय राऊत यांनी लिहिलेल्या पुस्तकावरून लगावला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, त्यांची भाषा, त्यांची बोली आणि त्यांचे हावभाव रोज सकाळी नऊ वाजता महाराष्ट्रातील जनता पाहाते. कधीतरी परमेश्वरांनी त्यांना बुद्धी दिली नाही की आपण चांगलं बोलावं म्हणून. त्यामुळे त्यांनी त्यांचे जे काही अनुभव या पुस्तकात सांगितलेले आहेत, ते काही स्वातंत्र्य लढा लढून आलेले आणि जेलमध्ये नव्हते गेले. ते कोणत्या कारणामुळे जेलमध्ये गेले होते हे त्यांनी रोखठोकमध्ये लिहावं, त्यांनी जर असं म्हटलं असतं की मी देश सेवा करताना आणि महाराष्ट्राच्या हिताच्या गोष्टी करताना जेलमध्ये गेलो, आणि मला असे अनुभव आले तर ती गोष्ट आम्ही मान्य केली असती, असा खोचक टोलाही यावेळी रावसाहेब दानवे यांनी राऊत यांना लगावला आहे.

उद्धव ठाकरेंना टोला

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांना देखील पुन्हा एकदा डिवचलं आहे,

# पालघरमध्ये रासायनिक कारखान्यात गॅस गळती, दहा कामगारांची प्रकृती बिघडली

पालघर जिल्ह्यातल्या बोईसरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका रासायनिक कारखान्यामध्ये निष्काळजीमुळे गॅस गळती झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दहा पेक्षा अधिक कामगारांची प्रकृती बिघडली आहे. ही दुर्दैवी घटना बोईसच्या तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये घडली आहे. विशेष म्हणजे जेव्हा गॅस गळतीमुळे कामगारांची प्रकृती बिघडल्याचं लक्षात आलं तेव्हा या रासायनिक कारखान्याच्या मॅनेजरनं ही घटना दाबवण्याचा प्रयत्न केला असा आरोप होत आहे. या घटनेनंतर कारखान्याच्या व्यवस्थापकानं सर्व



मजुरांना दुसऱ्या ठिकाणी हलवलं. मात्र जेव्हा कामगारांना तीव्र वेदना होऊ लागल्या, डोळ्यांमध्ये आणि नाकामध्ये तीव्र जळजळ जाणवू लागली, त्यांची प्रकृती खालावली तेव्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रकरण उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाची पाहाणी केली.

प्रकृती खालवल्यानंतर केलं रुग्णालयात दाखल

मिळालेल्या माहितीनुसार हा गॅस इतका विषारी होता की, या गॅसच्या संपर्कात जे मजूर आले, त्यांना तीव्र वेदना होऊ लागल्या, त्यांच्या डोळ्यात आणि नाकात तीव्र जळजळ होऊ लागली, त्यांची प्रकृती खालावली, ते जोरजोरात ओरडून लागले. सुरुवातीला या कारखान्याच्या व्यवस्थापकानं हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. मात्र कामगारांची प्रकृती बिघडल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं, या कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानं हे प्रकरण समोर आलं आहे.

धक्कादायक बाब म्हणजे कोणतीही सुरक्षिततेची काळजी न घेता या कारखान्यामध्ये धोकादायक केमिकलचं उत्पादन सुरू होतं. यामुळे पुन्हा एकदा कामगारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. सध्या या कामगारांची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

बीड, दि. 18 राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. 19 मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे. सकाळी 8:05 वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 8:15 वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. 8:15 वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 9:00 वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी 9.00 वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 10.30 वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी 10.30



वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी 11.30 वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी 11.30 ते 12.30 राखीव. दुपारी 12.45 वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी 12.50 वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी 1.15 वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी 1.20 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी 1.30 वाजता बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक. दुपारी 3.30 वाजता बीड जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व सन 2025-26 आढावा बैठक. सायं. 4.30 वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. नंतर पत्रकार परिषद. त्यानंतर मोटारीने गेवराईकडे प्रयाण. सायं 7.00 वाजता कृष्णाई निवास, जुन्या बस स्टँड समोर, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं 7.00 वाजता राखीव . नंतर मोटारीने प्रयाण. सायं 7.30 वाजता आर.बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं 7.30 वाजता विविध विकास कामांचा शुभारंभ. नंतर राखीव. रात्री 9.45 वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण. *****

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १९ मे २०२५
https://lokaarambh.com



# भारताकडून बांगलादेशाला मोठा झटका या वस्तूंच्या आयातीवर लादले निर्बंध

बांगलादेशातील सत्ताबदलानंतर युनूस सरकार आणि भारत यांच्यातील संबंध अधिकाधिक कटू होत चालले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारत सरकारने शनिवारी बांगलादेशातून तयार कपड्यांची (आरएमजी) आयात फक्त कोलकाता आणि न्हावा शेवा या दोन सागरी बंदरांपर्यंत मर्यादित केली. याचसोबत भारताने ईशान्येकडील राज्यांसाठी 11 भू-सीमा चेकपोस्टवरून ग्राहकोपयोगी वस्तूंच्या आयातीवरही बंदी घातली आहे. बांगलादेशने भारतीय निर्यातीवर लादलेल्या निर्बंधाना प्रत्युत्तर म्हणून हे पाऊल उचलण्यात आलं आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने (DGFT) जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलंय की आता बांगलादेशातून RMG आयात फक्त कोलकाता आणि न्हावा शेवा या दोन बंदरांमधूनच करता येईल. बांगलादेशविरोधात भारताचं ठोस पाऊल बांगलादेशाची भारतात होणारी वार्षिक आरएमजी निर्यात सुमारे 700 दशलक्ष डॉलर इतकी आहे. त्यापैकी आतापर्यंत 93% माल हा जमिनीच्या मार्गाने येत असल्याने हा निर्णय महत्त्वाचा मानला जातोय. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ईशान्य भारताच्या सीमेवरील भू-बंदरांवर बांगलादेशने लादलेल्या निर्बंध आणि आयात तपासणीमुळे भारताने हे पाऊल उचललं आहे. बांगलादेशने 13 एप्रिलपासून धाग्याच्या आयातीवर बंदी घातली आहे, तर 15 एप्रिलपासून हिली आणि बेनापोल एकात्मिक तपासणी



नाक्यांवर (IPC) भारतीय तांदळाची आयात थांबवण्यात आली आहे. बांगलादेशने भारतीय वस्तूंवर प्रति टन प्रति किलोमीटर 1.8 रुपये इतका अन्याय्यपणे जास्त ट्रान्झिट शुल्क लादल्याचा भारताचा आरोप आहे. ज्यामुळे बांगलादेशी हद्दीतून भारतीय वस्तूंच्या वाहतुकीच अडथळा निर्माण होत आहे. तसंच ईशान्येकडील राज्यांमधून स्थानिक पातळीवर उत्पादित वस्तूंचा बांगलादेशी बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यावरही परिणाम झाला आहे.

## या वस्तूंच्या आयातीवर लादले निर्बंध

रेडीमेड कपड्यांव्यीतिरिक्त बंदी घातलेल्या वस्तूंच्या यादीमध्ये प्लास्टिक आणि पीव्हीसी उत्पादनं, लाकडी फर्निचर, फळांची आणि कार्बोनेटेड पेये, बेकरी, कापसाशी संबंधित टाकाऊ वस्तू आणि मिठाई उत्पादनं यांचा समावेश आहे. हे सर्व आता मेघालय, आसाम, त्रिपुरा, मिझोरम आणि पश्चिम बंगालमधील 11 नियुक्त सीमा चौक्यांमधून भारतात प्रवेश करू शकणार नाहीत. भूतान आणि नेपाळला पाठवल्या जाणाऱ्या बांगलादेशी वस्तूंवर हे निर्बंध लागू होणार नाहीत, असंही भारताने स्पष्ट केलंय. ईशान्येकडील राज्यांमध्ये स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि निष्पक्ष व्यापार सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचं सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. "भारताने नेहमीच परस्पर आणि निष्पक्षतेच्या आधारावर व्यापार केला आहे, परंतु बांगलादेशने आमच्या सद्भावनेला प्रतिसाद दिला नाही", असं ते म्हणाले. 2023-24 या आर्थिक वर्षात भारत आणि बांगलादेशमधील एकूण व्यापार हा 12.9 अब्ज डॉलर्स होता.

# सचिन बेंडभर यांची साहित्य क्षेत्रात उत्तुंग भरारी

पुणे जिल्ह्यातील युवा साहित्यिक सचिन बेंडभर यांचे मराठी साहित्यात विपूल लेखन आहे. आजपर्यंत त्यांची 58 पुस्तके प्रकाशित आहेत. यात बालसाहित्य, कथासंग्रह, कवितासंग्रह, कादंबरी आणि अनुवाद असे त्यांचे विविधांगी लेखन आहे. या वर्षीचा राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

मुळ पिंपळे जगताप (ता. शिरूर) गावच्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या बेंडभर यांच्या विविध साहित्य निर्मितीची महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने दखल घेत त्यांच्या कळो



निसर्ग मानवा या कवितेची निवड सहावीच्या सुगमभारती पुस्तकात केली आहे. तसेच मामाच्या मळ्यात या बालकाव्यसंग्रहाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी (एम.ए.) द्वितीय वर्षीच्या अभ्यासक्रमात पुढील पाच वर्षांसाठी समावेश करण्यात आला आहे.

स्वतः लेखक व कवी असून वयापेक्षा विपुल साहित्य संपदा स्वतःच्या नावावर असलेल्या सचिन बेंडभर यांच्या कथा,कविता,लेख,कादंबरी विविध लोकप्रिय वृत्तपत्रातून,मासिकातून तसेच दर्जेदार दिवाळी अंकातून सातत्याने प्रकाशित होत आहेत.

"येते जगाया उभारी" हा प्रकाशित झालेला त्यांचा काव्यसंग्रह राज्यभर गाजत आहे.या काव्यसंग्रहास आजपर्यंत आठ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

स्वतः लिहीत असताना त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांना लिहिते केले. मनातल्या कविता,शिंपल्यातले मोती आणि परीसस्पर्श अशी विद्यार्थ्यांची तीन पुस्तके त्यांनी संपादित करीत त्यांनी शाळेत अनेक बालकवी घडवले आहेत. त्यांची येते जगाया उभारी ही कविता, मंथन प्रकाशनाने शिष्यवृत्ती प्रश्नपत्रिकेत ज्ञानवंतच्या आठव्या अंकात ५ वर्षासाठी घेतली आहे. अत्यंत कमी वयामध्ये सचिन यांनी बालसाहित्य, कथा, कविता, कादंबरी, अनुवाद या वेगवेगळ्या विभागात लेखन करुन अल्पावधीत साहित्यक्षेत्रात आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे.

सचिन यांच्या कथांना जसा विनोदी बाज असतो, तसा कवितांना शेती-मातीचा गंध असतो. रानवारा, गाणं शिवाराचं, येते जगाया उभारी या तीन काव्यसंग्रहातून त्यांनी शेतक-याचे जीवन, त्यांचे दुःख मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कळो निसर्ग मानवा या कवितेला वढू खुर्द ग्रामस्थांनी शाळेच्या भिंतीवर झळकवले, तर येते जगाया उभारी या कवितेलाही वाबळेवाडी ग्रामस्थांनी शाळेच्या भिंतीवर साकारले आहे.

## वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून सरन्यायाधीश नाराज

सर्वोच्च न्यायालयाचे 52 वे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांची निवड झाली, या निमित्त महाराष्ट्र आणि गोवा बार काऊन्सिलतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश भूषण गवई चांगलेच भावुक झाले. तुम्ही सगळ्यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि प्रेम पाहून भरून आलं. शपथ घेताच देशातल्या जनतेने मला भरभरून प्रेम दिलं, असं भूषण गवई यांनी म्हटलं आहे.नेमकं काय म्हणाले भूषण गवई तुम्ही सगळ्यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि प्रेम पाहून भरून आलं. शपथ घेताच देशातल्या जनतेने मला भरभरून प्रेम दिलं. आपले प्रेम सतत लाभलेले आहे आणी नेहमी लाभत राहील, आजचा कार्यक्रम जीवनाच्या अंतपर्यंत लक्षात राहील. माझ्या प्रवसाची सुरुवात अमरावती जिल्ह्यात झाली, नगरपरिषदेच्या शाळेमध्ये मी, शिकलो वाढलो. आज मी जो काही आहे, आई बाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यामध्ये फार मोठा सहभाग आहे, असं गवई यांनी म्हटलं आहे.दरम्यान पुढे बोलताना गवई यांनी म्हटलं की, माझ्या जडण घडणीत मोठा वाटा हा माझ्या वडिलांचा आहे. मला आर्किटेक व्हायचं होतं, पण वडिलांना वकील व्हायची इच्छा होती

## फडणवीस मुख्यमंत्री होते तेव्हा...सचिन वाझेप्रकरणी अबू आझमींचे गौप्यस्फोट!

वाझे पुन्हा नोकरीत आला नसता तर राजकारणातील कटू प्रसंग टाळता आले असते असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले आहेत. वाझेला पुन्हा सेवेत घेऊ नया या मागणीला घेऊन मी पवारांना भेटलो होतो, असेही राऊत म्हणाले आहेत. यावर आता सपाचे आमदार अबू आझमी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वाझेला पुन्हा सेवेत घेणं चुकीचंच होतं, असं आझमी म्हणालेत. ... असे असताना वाझेला नोकरीवर घेणे चुकीचे होते- आझमीसचिन वाझे यांना पुन्हा नोकरीवर घेण्याची बातमी आली तेव्हा मी संजय राऊत यांची मी भेट घेतली होती. हा फार मोठा अन्याय आहे. ख्वाजा युनूस यांना मारण्याचा खटला अजूनही त्यांच्यावर चालू आहे. असे असताना पुन्हा सेवेत घेणं चुकीचं आहे, असं मी त्यांना म्हणालो होतो. शरद पवार यांनीही आम्ही वाझे यांना सेवेत घेणार नाही, असं सांगितलं होतं. पण थोड्या दिवसांनी वाझेला सेवेत घेण्यात आलं.

## कांदिवली पश्चिम मध्ये भाजपाच्या वतीने तिरंगा यात्रा संपन्न.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम कांदिवली पश्चिम मध्ये भाजपाच्या वतीने तिरंगा यात्रा काढण्यात आली होती.ही तिरंगा यात्रा भाजपा उत्तर मुंबई चे अध्यक्ष बाळा तावडे यांच्या नेतृत्वाखाली हिंदूस्थान नाका ते एस व्ही रोड फायर ब्रिगेडच्या समोरील खासदार पियुष गोयल यांच्या लोककल्याण कार्यालयापर्यंत तिरंगा यात्रा काढण्यात आली होती.या तिरंगा यात्रे मध्ये वार्ड क्रमांक २०,२१,३०,३१,२२ अशा पाच वार्ड मधील भाजपचे पदाधिकारी सभासद सदस्य आणि कार्यकर्ते पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रत्येकाच्या हातात यावेळी भारताचा तिरंगा झेंडा होता,भारत माता की जय व देशभक्ती पर घोषणांनी परिसर दणाणून गेला होता, नुकत्याच पाकिस्तान शी झालेल्या सिंदूर आप्रेशन यशस्वी झाल्याने वायुसेना जलसेना, आणि भूदल सेना अशा तीन्ही विभागातील सैनिकांच्या शोर्याला , सन्मान पूर्वक सलाम करण्यात येत होता, या तिरंगा यात्रा मध्ये लहान मुलींनी भारत माता, वायुसेना, भूदल सेना सैनिकांची वेशभूषा




करण्यात आले होते,या प्रसंगी उत्तर मुंबई अध्यक्ष बाळा तावडे, कमलेश यादव,मा.नगरसेविका प्रियंका मोरे,मा.नगरसेविका प्रतिभा गिरकर,मा.नगरसेविका लिना देहरकर. निखिल व्यास, पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके, सुलभा जोशी, तन्वी अमृते, प्रमोद घाग, गजानन गवई, शंकर गिरी ,संजय सिंह,समशुद्दीन चौधरी, मुकेश चौधरी, दिनेश सिंग, अफजल खान आदी उपस्थित होते .या वेळी वातावरण देशभक्ती मय होऊन गेले होते.

# प्रार्थना करा, अल्लाहने त्यांची शेपटी सरळ करावी, नाहीतर ओवेसींच्या त्या वक्तव्याने पाकड्यांची आग आग

पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांनी पहलगाम हल्ला विचारपूर्वक आणि जाणीवपूर्वक असे डिझाईन तयार केले की, त्यामुळे देशात दोन समाजात, धर्मात तणाव वाढेल. त्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारला आणि त्यांना कलमा वाचायला लावला. ज्यांनी स्वतःला हिंदू सांगितले. ज्यांना कलमा वाचता आला नाही. त्यांना वेगळे करून गोळ्यांनी ठार करण्यात आले. या दहशतवादी हल्ल्यात 26 पर्यटकांना प्राण गमवावे लागले. पण पाकिस्तानचा हा कट भारताने यशस्वी होऊ दिला नाही, असे वक्तव्य खासदार आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी केले. त्यांनी पाकिस्तानवर टीका केली. शुक्रवारी हैदराबाद येथील हज हाऊसमध्ये त्यांनी हज यात्रेकरूंशी संवाद साधला. त्यावेळी पाकच्या नापाक कटाची माहिती देत त्यांनी मोठे विधान केले.तर मग वेळ येईल की... हज यात्रेकरूंशी बोलताना त्यांनी पाकड्यांना जबरदस्त संदेश दिला. त्यांनी हज यात्रेकरूंना मोठे आवाहन केले. आपला शेजारी सुधारणारा नाही, प्रार्थना करा, अल्लाहने त्याची शेपटी सरळ करावी, नाहीतर वेळ येईल तेव्हा त्यांची ही शेपटी सरळ करावी लागेल, असे ते म्हणाले. ही यात्रा धैर्य, कृतज्ञता आणि विनम्रतेने पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले. ही यात्रेकरूंची आध्यात्मिक परीक्षा असल्याचे ओवेसी म्हणाले. धैर्य, त्याग आणि बंधुभावाच्या गुणांचा अभ्यास करावा असे ते म्हणाले. ओवेसी आणि थरूर यांचे कौतुक पाकिस्तान विरोधातील तणावात केंद्र सरकारला समर्थन दिल्याबद्दल केरळ येथील भारतीय जनता पक्षाच्या केरळ राज्याचे प्रमुख राजीव चंद्रशेखर यांनी काँग्रेस खासदार शशी थरूर आणि ओवेसी यांचे कौतुक केले. त्यांना धन्यवाद दिले. हे दोन्ही भाजपाविरोधातील पक्ष असले तरी ते देशभक्त असल्याचे चंद्रशेखर म्हणाले. जेव्हा देश संकटात होता, तेव्हा हे दोघे राजकारण बाजूला सारत देशाच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले असे ते म्हणाले.

केंद्र सरकारने सर्व पक्षांच्या खासदारांना 22 आणि 23 मे रोजी दहा दिवसांच्या परदेश दौऱ्यावर पाठवणार आहे. यामध्ये अमेरिका, इंग्लंड, दक्षिण अफ्रिका, कतार आणि संयुक्त अरब अमिरातसह इतर काही देशांचा समावेश आहे. हे शिष्टमंडळ पाकिस्तानच्या दहशतवादाची पोलखोल करणार आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com